**ठळक बातम्या**

- माझी लाडकी बहीण योजनेसह कोणत्याही कल्याणकारी योजना बंद होणार नाहीत अशी मुख्यमंत्र्यांची ग्वाही

- मुख्यमंत्र्यांनी केलं, मुंबईतल्या विविध प्रकल्पांचं आणि विकासकामांचं भूमिपूजन तसंच लोकार्पण

- राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्दिकी यांच्या हत्येप्रकरणी दोन जणांना अटक

- राज्यात कायदा सुव्यवस्थेचा बोजवारा उडाल्याचा विरोधकांचा आरोप

- संविधानाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त केंद्र सरकारच्या वतीनं प्रत्येक गावात संविधान गौरव अभियान राबवण्यात येणार

**आणि**

- आशियाई टेबल टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत महिला दुहेरी प्रकारात भारताच्या ऐहिका मुखर्जी आणि सुतीर्था मुखर्जी या जोडीने पटकावलं कांस्यपदक

**<><><><><>**

माझी लाडकी बहीण योजनेसह कोणत्याही कल्याणकारी योजना बंद होणार नाहीत अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज दिली. नांदेडमध्ये आयोजित महिला सशक्तीकरण अभियान मेळाव्यात ते बोलत होते. आचारसंहितेमुळे दोन महिन्यांचे पैसे आगाऊ दिल्याचा उल्लेख करत

लाडक्या बहिणींनी साथ दिली तर या योजनेतून दिल्या जाणाऱ्या पैशांमध्ये टप्प्याटप्प्याने वाढ होईल अशी हमीसुद्धा यावेळी मुख्यमंत्र्यांनी दिली.

वर्षाला तीन गॅस सिलेंडर मोफत देणारी अन्नपूर्णा योजना, मुलींना मोफत शिक्षण अशा योजनांचा उल्लेख करत या योजना म्हणजे महिलांना कायमस्वरुपी ओवाळणी आहे असं त्यांनी सांगितलं. युवकांना भत्त्यासह प्रशिक्षण देणारं देशातलं महाराष्ट्र हे पहिलंच राज्य आहे असं ते म्हणाले.

**<><><><><>**

मुंबईतल्या विविध प्रकल्पांचं आणि विकासकामांचं भूमिपूजन तसंच लोकार्पण आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबईत केलं. मराठी भाषा भवनाच्या भूमीपूजनासह जवाहर बालभवन, सावित्रीबाई फुले विद्यार्थिनी वसतीगृह यांच्या नवीन इमारती, तसंच दादर भायखळा नायगाव शिवडी शीव इथल्या पोलीस वसाहतींचं लोकार्पण अशा अनेक विकासकामांचा यात समावेश आहे. त्यानंतर नवी मुंबईत वाशी इथं शीव- पनवेल महामार्गावर ठाणे खाडी पुलाच्या एका  मार्गिकेचं लोकार्पण तसंच रेवस-रेडी सागरी महामार्गावरच्या ७ खाडी पुलांच्या कामांचं भूमिपूजन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं.

**<><><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्दिकी यांच्या हत्येप्रकरणी मुंबई  पोलिसांनी दोन जणांना अटक केली आहे. तिसरा आरोपी फरार असून त्याचा शोध सुरू आहे. गुरमैल सिंग आणि धर्मराज कश्यप या दोन आरोपींना आज किल्ला न्यायालयासमोर हजर करण्यात आलं. त्यापैकी गुरमैल सिंग याला

येत्या २१ ऑक्टोबर पर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली तर धर्मराज कश्यप याच्या वयाची चाचणी झाल्यानंतर त्याला पुन्हा हजर करण्याचे आदेश न्यायालयानं पोलिसांना दिले आहेत.

मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेची १५ पथकं सर्व बाजूंनी या प्रकरणाचा तपास करत असून अन्य राज्यांच्या पोलिसांची मदतही घेण्यात येत आहे, अशी माहिती गुन्हे अन्वेषण शाखेच्या अधिकाऱ्यांनी वार्ताहर परिषदेत दिली. कुख्यात बिष्णोई टोळीचा या हत्येत सहभाग असल्याचे समाजमाध्यम संदेश प्रसारित झालं आहे, त्या संदेशाच्या सत्यतेविषयीही तपास सुरू असल्याचंही या वार्ताहर परिषदेत पोलिसांनी स्पष्ट केलं.

**<><><><><>**

माजी मंत्री, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्दीकी यांची काल मुंबईत हत्या झाली. या घटनेच्या पार्श्वभूमीवर मुंबईत कोणतीही टोळी पुन्हा सक्रीय होणार नाही, याची खबरदारी घेण्याच्या सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पोलिसांना दिल्या आहेत.

बाबा सिद्दीकी यांच्या पार्थिवावर मुंबईत मरीन लाईन्स इथल्या बडा कब्रस्तान दफनभूमीत शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. या पार्श्वभूमीवर सर्वत्र पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

बाबा सिद्दिकी यांच्या मृत्यूबद्दल अनेक नेत्यांनी शोक प्रकट केला आहे.

राजकीय नेत्याची हत्या झाल्याच्या पार्श्वभूमीवर विरोधी पक्षांनी राज्यातल्या कायदा आणि सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं आहे. विधानसभेतले विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी राज्यातली कायदा

आणि सुव्यवस्था बिघडली आहे, असा आरोप करत गृहमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे.

**<><><><><>**

राज्यात कायदा आणि सुव्यवस्थेचा बोजवारा उडाला असल्याचा आरोप शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अध्यक्ष उद्धव ठाकरे यांनी केला आहे. राज्यातल्या आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीच्या प्रमुख नेत्यांनी आज मुंबईत पत्रकार परिषद घेतली. त्यावेळी ते बोलत होते. महिलांवर अत्याचार होत आहेत, राजकीय नेते सुरक्षित नाहीत मग जनतेच्या सुरक्षेचं काय? असं म्हणाले.

देशाच्या राजकारणात महाराष्ट्राच्या प्रशासनाचा एक वेगळा दबदबा होता मात्र सध्याच्या सरकारनं हा नावलौकिक धुळीला मिळवला आहे, अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी यावेळी केली. राज्य सरकारनं गेल्या दोन तीन महिन्यात अनेक निर्णय घेतले, या निर्णयांची अंमलबजावणी होणं शक्य आहे का? असा सवाल त्यांनी केला.

राज्यात दररोज ७ शेतकरी आत्महत्या करीत आहेत त्याची दखलही राज्य सरकार घेत नसल्याची टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली. अतिवृष्टीबाधित शेतकऱ्यांच्या नुकसानीची पाहणी करायला केंद्राचं पथक आंध्र प्रदेशात गेलं मात्र महाराष्ट्रात आलं नाही असा उल्लेख त्यांनी केला.

**<><><><><>**

भारतीय संविधानाला येत्या २६ नोव्हेंबर रोजी ७५ वर्ष पूर्ण होत आहेत, या निमित्ताने केंद्र सरकारच्या वतीनं प्रत्येक गावात संविधान गौरव अभियान राबवण्यात येणार आहे, अशी माहिती केंद्रीय अल्पसंख्याक आणि संसदीय कार्यमंत्री किरेन रिजीजू यांनी दिली. ते आज छत्रपती संभाजीनगर इथं पत्रकार परिषदेत बोलत होते. संविधानात बदल करण्यात येणार असा अपप्रचार काही घटकांकडून होत आहे, या अपप्रचाराला बळी पडू नका, असं आवाहन रिजीजू यांनी केलं.

**<><><><><>**

गोंदिया जिल्ह्यातल्या तिरोडा-गोरेगाव विधानसभा क्षेत्रातल्या धापेवाडा उपसा सिंचन योजना टप्पा क्रमांक दोन अंतर्गत ५ हजार २१७ कोटी रुपयांच्या विकासकामांचं तसंच, तिरोडा नगर परिषद आणि गोरेगाव नगर पंचायत क्षेत्रातल्या २०५ कोटी रुपयांच्या विकास कामांचं भूमिपूजन आज उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झालं. त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाला खासदार प्रफुल्ल पटेल, आमदार धर्मरावबाबा आत्राम, भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित होते.

**<><><><><>**

कझाकस्तानमध्ये अस्ताना इथं सुरु असलेल्या आशियाई टेबल टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत महिला दुहेरी प्रकारात भारताच्या ऐहिका मुखर्जी आणि सुतीर्था मुखर्जी या जोडीनं इतिहास रचत कांस्यपदक पटकावलं आहे. आशियाई अजिंक्यपद स्पर्धेत महिला दुहेरीमध्ये पदक मिळवणारी ऐहिका आणि सुतीर्था ही पहिलीच भारतीय जोडी आहे. उपांत्य फेरीच्या आज

झालेल्या सामन्यात जपानच्या मिवा हरिमोटो आणि मियुउ किहाराया या जोडीनं भारतीय जोडीचा पराभव केला. त्यामुळे भारताला कांस्यपदकावर समाधान मानावं लागलं.

**<><><><><>**

संयुक्त राष्ट्र दिनानिमित्त येत्या २४ ऑक्टोबरला, केंद्र सरकारचे सर्व विभाग, राज्य सरकारं तसंच केंद्रशासित प्रदेशांनी आपल्या सर्व प्रमुख कार्यालयीन इमारतींवर संयुक्त राष्ट्रांचा ध्वज आणि राष्ट्रीय ध्वज तिरंगा फडकवावा, असे निर्देश केंद्रीय गृहमंत्रालयानं दिले आहेत. मात्र राष्ट्रपती भवन, उपराष्ट्रपती भवन, संसद भवन, सर्वोच्च न्यायालयाची इमारत, देशभरातली उच्च न्यायालयं, राजभवन, राज निवास किंवा विधानपरिषद आणि विधानसभेच्या इमारतींवर संयुक्त राष्ट्राचा ध्वज फडकवू नये, असं मंत्रालयानं जारी केलेल्या निर्देशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

वाशिम इथं शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरु झालं असून त्याला पूरक अशा वैद्यकीय उपकरणांचा कारखाना वाशिम जिल्ह्यात लवकरच सुरू करण्यात येणार आहे, अशी माहिती केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दिली. ते आज वाशिम इथं एका प्रकाशन सोहळ्यात बोलत होते. या कारखान्यामुळे ३ हजार युवकांना रोजगार मिळेल, असंही त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

मुंबईत आज दुपारी मुंबई सेंट्रल रेल्वे स्थानकाजवळ एका उपनगरीय रेल्वे गाडीचे दोन डबे रुळावरून घसरले. कारशेडमध्ये चाललेल्या गाडीत

कोणतेही प्रवासी नव्हते, त्यामुळे जीवितहानी टळली. या अपघातात रेल्वेच्या डब्यांबरोबरच रुळांचंही नुकसान झालं. यामुळे फलाट क्रमांक १ वरून होणारी वाहतूक विस्कळीत झाली.

<><><><><>

मुंबईच्या विमानतळ आयुक्तालयाच्या अधिकाऱ्यांनी मुंबई विमानतळावर एका प्रवाशाकडून अंदाजे ५९ लाख ६० हजार रुपये किमतीचा ५९६ ग्रॅम गांजा जप्त केला आहे. विमानतळावरच्या हवाई गुप्तचर विभागाने संशयाच्या आधारावर एका प्रवाशाला अडवून त्याची झडती घेतली. त्यावेळी त्याच्याकडे असलेल्या ट्रॉलीत खाद्यपदार्थांच्या पाकिटांमध्ये हा गांजा लपवून आणल्याचं आढळलं.

<><><><><>

काल दिवसभरात राज्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडला. येत्या दोन दिवसात कोकण, विदर्भ आणि मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी पावसाची शक्यता आहे.

//<><><><><>//